# ऑनलाइन फसवणुकीतील पीडितांना मोफत मार्गदर्शन

## आत्महत्या कमी करण्याचा प्रयत्न

मुंबई, ता.२० : देशात सायबर फसवणूक दिवसेंदिवस वाढत असून ऑनलाइन ब्लॅकमेलिंगमुळे अनेक जण आपल्या जीवाला मुकत आहेत. विशेषतः तरुणांमध्ये फसवणुकीच्या घटना वाढत असून ऑनलाइन फसवणूक थांबवण्यासाठी ए. यु. कॉर्पोरेट ॲडवायजरी अँड लीगल सर्विसेज व व्हॉट नाऊ या दोन संस्थानी एकत्र येत मंच उपलब्ध करून दिला आहे.

या मंचाद्वारे फसवणूक झालेल्या पीडितांना मोफत मार्गदर्शन केले जाणार आहे. यामुळे फसवणूक झालेल्या पीडितांची आत्महत्त्या कमी होण्यास मदत होईल, असा दावा करण्यात आला आहे. ए. यू. कॉर्पोरेट ॲडवायजरी अँड लीगल सर्विसेज संस्थापक अक्षत खेतान, व्हॉट नाऊच्या संस्थापिका नीती गोयल तसेच सह-संस्थापिका डॉ. निवेदिता श्रेयांस यांनी एकत्र येत सायबर फसवणूक झालेल्यांसाठी लागणारी कायदेशीर मदत, मानसोपचारद्वारे मदत, यासाठी व्यासपीठ व प्रणाली तयार केली आहे.

सायबर फसवणुकी पीडितांनी कोणतेही टोकाचे पाऊल उचलू नये, यासाठी ९०१९११५११५ हा क्रमांक देण्यात आला आहे.